भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
बांधकाम विभाग

<u>प्रस्तावना</u> :-

**विषय :- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील गायत्रीनगर, नुरीनगर,कब्रस्तान ते बीएमसी पाईपलाईन पर्यंत आर.सी.सी.रस्ता तयार करणे, गटार तयार करणे, पेव्हरब्लॉक लावणे, कब्रस्तानला वॉल बाँड्री करणे. (महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान जिल्हास्तर योजने अंतर्गत.२०२३-२४)**

मा.श्री.शंभुराजे देसाई, पालकमंत्री, ठाणे तथा मंत्री, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य यांनी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,करीता "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान जिल्हास्तर"या योजनेअंतर्गत निधी बाबत पत्रान्वये मागणी केली आहे. त्या अनुषंगाने विषयांकीत काम "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान जिल्हास्तर"या योजने अंतर्गत प्रस्तावित करणेबाबत महाराष्ट्र शासन जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडील पत्र,जा.क्रं.नगरोत्थान/का.४/२०२३/२४/३७१९ दिनांक-२२/१२/२०२३ च्या पत्रान्वये कळविणेत आले आहे. सदरचे काम संदर्भिय पत्रामधील विवरणपत्रात क्रं. ०२ वर असुन सदर कामाचे अंदाजपत्रक सादर करणे अपेक्षित आहे. सदर योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन समितीचा ७०% हिस्सा व महानगरपालिकेचा ३०% हिस्सा राहणार आहे. विषयांकीत ठिकाणी पहाणी केली असुन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील चाविंद्रा ते पोगांव याठिकाणी पेव्हरब्लॉक बसवणे, गटार बनवणे, नुरी नगर कब्रस्तान येथे वॉल बाँड्री बनविणे आवश्यक आहे.

विषयांकीत कामी रक्कम रु.९९,९९,१२०/- (अक्षरी रु.नव्यांनवद लाख नव्यांनव्वद हजार एकशे वीस रु.) मात्र खर्चाचा प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.आयुक्त यांनी दि.१४/०२/२०२४ रोजी मंजुरी दिली आहे. तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं.** ४६३ **दिनांक :-** २९/०५/**२०२४**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील गायत्रीनगर,नुरीनगर,कब्रस्तान ते बीएमसी पाईपलाईन पर्यंत आर.सी.सी.रस्ता तयार करणे. याकामी रक्कम रुपये रु.९९,९९,१२०/- (अक्षरी रु.नव्यांनवद लाख नव्यांनव्वद हजार एकशे वीस रु.) मात्र खर्चाचा प्रस्ताव मंजुरीस सादर केला आहे. त्यास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, रु.९९,९९,१२०/- (अक्षरी रु.नव्यांनवद लाख नव्यांनव्वद हजार एकशे वीस रु.) मात्र खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय:- प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रातील मनपा इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे कामी संस्था व दर निश्तिस करणे.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मनपा मालकीच्या इमारतीं बांधकामा करिता इम्पॅनलमेंट करणे कामी रितसर ई-निविदा प्रकिया राबवुन १) मे.निट अॅण्ड असोशिएट्स,भिवंडी, २) ओरिएंटल कन्सल्टींग इंजिनिअर अॅण्ड असोशिएट्स व ३) आर.आर. कन्सल्टींग इंजिनिअर या संस्थांची नेमणुक करण्यात आली आहे. महानगरपालिकेत मनपा मालकीच्या प्रकल्पांवर अंदाजपत्रक तयार करणे,नकाशे तयार करणे,देयके तयार करणे यासारखी कामे सदर पॅनलवर नियुक्त संस्थेच्या मार्फत करण्यात येते.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मनपा मालकीच्या इमारती करिता स्ट्रक्चरल ऑडीट करणे कामी संस्थेची नेमणुक नसल्याने व मनपा इम्पॅनलमेंट नियुक्त केलेले संस्था या महानगरपालिकेच्या नगररचना विभागात स्ट्रक्चरल इंजिनिअर म्हणुन नियुक्त असल्याने नविन स्ट्रक्चरल कन्सल्टन नेमे पर्यत मनपा पॅनलवरील यातीन संस्थे मार्फत महानगरपालिका इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्या कामीचे मौखीक निर्देश तत्कालीन मा.आयुक्त श्री.डॉ.पंकज आशिया यांनी दिले होत. त्यानुसार नगररचना विभागा मार्फत सी-१ कॅटगरित असलेल्या इमारतींचे दर रु. ५/- प्रति चौ.फुट व सी-२ बी कॅटगरित असलेल्या इमारतींचे दर रु. ४/- प्रति चौ.फुट निश्चित करणे कामी प्रस्ताव तत्कालीन मा.आयुक्त यांच्या मंजुरी करीता सादर करण्यात आले होते. सदर प्रस्तावावर तत्कालीन मा.आयुक्त यांच्या दि.०९/०३/२०२१ च्या रिपोर्टनुसार त्यांनी सदर प्रकरणी मुख्यलेखा व वित्तअधिकारी सो. यांचा अभिप्राय अपेक्षिलेला होता. मात्र मुख्यलेखा व वित्तअधिकारी यांच्या अभिप्राया नंतर सरदची नस्ती देयक मंजुरी करीता गेल्याचे दिसुन येते. मनपा इमारींचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडीट करणे कामी आरोग्य विभाग,शिक्षण विभाग व प्रभाग अधिकारी यांचेकडुन प्राप्त मागणीनुसार कामाची निकड पाहता सदरचे काम तातडीने करुन घेण्यात आलेले आहे. तद्‌नंतर सदर नस्तीवर तत्कालीन मा.आयुक्त यांची मंजुरी दिसनु येत नाही. सदर प्रकरणी आता पर्यत झालेल्या स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट नुसार संस्थेस याच दराने देयके अदा करण्यात आलेली आहेत.

तसेच पावसाळया पुर्वी धोकादायक मनपा इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे गरजेचे आहे. मा.आयुक्त सो.यांच्या दालनात झालेल्या आपत्ती व्यवस्थापन बैठकीत देखील धोकादायक इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे कामीचे निर्देश देण्यात आलेले आहेत. तरी विषयांकित प्रकरणी सी-१ कॅटगरी इमारतीकरिता रु.५/- प्रति चौ.फुट व सी-२बी, सी-२अे, सी-३ कॅटगरी इमारती करिता रु.४/- प्रति चौ.फुट दरास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्व्ये दर मंजुरी करणेकामी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्र.:-** ४६४ **दिनांक :-** २९/०७ **/२०२४**

तरी विषयांकित प्रकरणी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेकामी सी-१ कॅटगरी इमारतीकरिता रु.५/- प्रति चौ.फुट व सी-२बी, सी-२अे, सी-३ कॅटगरी इमारती करिता रु.४/- प्रति चौ.फुट दरास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका विषयांकित कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (ड) अन्वये दर मंजुरी करणेकामी मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका